**नि.दि.दावा क्र.४३२/२०२४**
**अलका विरुद्ध ग्रामविकास अधिकारी पिंपळस**
**निशाणी क्र.११ वर पुढे**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा सरतपास विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. निमसे यांचेमार्फत शपथेवर सुरु-**

**२.** मी प्रस्तुत प्रकरणात माझ्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. आता मला शपथपत्र दाखविले. हे तेच आहे. त्यातील मजकुर खरा असुन त्यावर माझी सही आहे. **शपथपत्र नि.क्र.११** वर आहे.

**३.** तसेच मी माझ्या पुराव्यामध्ये वादी क्र. १ यांच्या नावे पोलीस अधिक्षक कार्यालय, नाशिक यांनी दिलेले दिनांक १० जुलै, २०२४ चे पत्र सादर केले आहे. सदर दस्त सार्वजनिक असल्याने **त्याला नि.क्र. २०** देण्यात आला.

**४.** तसेच मी माझ्या पुराव्यामध्ये दिनांक ०९/०३/२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक पंचवटी पोलिस ठाणे, नाशिक शहर यांनी दिलेले पत्र दाखल केले आहे. सदर दस्त सार्वजनिक **असल्याने त्याला नि.क्र. २१** देण्यात आला

**सरतपास - संपूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. ए. एस. चौधरी यांचे मार्फत शपथेवर सुरू -**

**५.** दावल चिमा सोनवणे माझे वडिल होते. माझे वडिल सरकारी नोकरीला होते. मी शोध घेतल्याबद्दल माझ्याकडे दस्त उपलब्ध नाही, कारण मी लहान होतो. माझे वडिल नाशिक पंचवटी पोलीस ठाण्यातून पोलीस नोकरीमध्ये असताना निघुन गेले. त्यावेळी वडिल बेपत्ता झाल्याबद्दल जाहीर प्रगटन देण्यात आले नाही. त्याबाबत पोलीसांत फिर्याद दिली होती. हे म्हणणे

खरे नाही की, माझे वडिल बेपत्ता झाल्याचे मी खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष दिली.

**<u>उलटतपास - संपूर्ण.</u>**
**<u>फेरतपास काही नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत

SANTOSH RAMAKANT BHARAD
Digitally signed by SANTOSH RAMAKANT BHARAD
Date: 2026.06.16 14:55:07 +0530

राहाता.
दिनांक - १६/०६/२०२६

(संतोष र. भरड)
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
(न्यायालय क्र.२), राहाता.